जावक क्र.४५६७/२०१८.
खडकी पोलीस स्टेशन, पुणे
दिनांक-१८/०९/२०१८.

प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो.
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
यांना सविनय सादर

रिपोर्ट- ए.ए.गायकवाड पो.ना. ६८१३ खडकी पोलीस स्टेशन, पुणे
यांजकडून विनंतीपुर्वक की

विषय- सर्व वर्तमानपत्रांत प्रसिद्धी होणेबाबत

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, खडकी पोलीस स्टेशन अकस्मात मयत रजि. नं. १३४/२०१८ सी.आर.पी.सी. १७४ मधील मयत इसम नामे एक अनोळखी पुरूष इसम वय-अंदाजे २५ वर्षे पुर्ण नाव, पत्ता माहीत नाही हा दि.०८/०९/२०१८ रोजी १३/०० वा. चे सुमारास शिवाजीनगर कोर्टाकडून जुना बाजारकडे जाणा-या पुलाच्या शेजारील रेल्वे ब्रीजवरील जाणा-या रेल्वेतून नदीपात्रात पडून मयत झाला आहे. त्याचे दि.०८/०९/२०१८ रोजी ससून हॉस्पीटल, पुणे येथे एम.एल.पी.एम.नं. ४५०४/२०१८ अन्वये पोस्टमॉर्टेम झाले असून सदर मयताचे कोणीही नातेवाईक मिळून आलेले नाही. सदर मयताचे वर्णन खालीलप्रमाणे.

संपुर्ण नाव,पत्ता- एक अनोळखी पुरूष इसम वय-अंदाजे २५ वर्षे पुर्ण नाव, पत्ता माहीत नाही रंगाने गोरा, अंगाने मध्यम, चेहरा गोल, नाक सरळ, केस कुरळे, दाढी-मिशी वाढलेली, नेसणीस मॅक्रोमॅन कंपनीची डार्क निळया रंगाची ट्रॅक पॅन्ट त्यावर भगव्या रंगाच्या दोन उभ्या लाईन असलेली, मॅक्रोमॅन कंपनीचा फिक्कट राखाडी रंगाचा फुलबाहयाचा टी-शर्ट त्यावर मॅक्रोमॅन कंपनीचा गोलामध्ये इंग्रजीमध्ये M अक्षराचा लोगो असलेला व राखाडी रंगाची व्ही.आय.पी. कंपनीची अंडरवेअर.

येणेप्रमाणे वरील वर्णनाचा इसम हा शिवाजीनगर कोर्टाकडून जुना बाजारकडे जाणा-या पुलाच्या शेजारील रेल्वे ब्रीजवरील जाणा-या रेल्वेतून नदीपात्रात पडून मयत झाला आहे.

तरी सदर मयताचे नातेवाईकांचा शोध होणेकामी सर्व वर्तमानपत्रांत प्रसिद्धी होणेस विनंती आहे.